॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
सत्याच्या मार्गावर चालणारे नेहमी विजय मिळवतात.




■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १५ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### शासनाचे अधिकृत संकेतस्थळ १५ व १६ मे रोजी बंद राहणार

● **मुंबई** – महाराष्ट्र राज्य शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in व शासन निर्णय संकेतस्थळ www.gr.maharashtra.gov.in हे पोर्टल नियमित देखभालीबरोबरच तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत करण्यात येणार आहे, त्यासाठी दि. १५ ते १६ मे २०२५ असे दोन दिवस या पोर्टलची सेवा बंद राहील, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने कळविले आहे. दि. १५ ते १६ मे या कालावधीत महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतीही सेवा उपलब्ध राहणार नाही याची राज्यातील सर्वसामान्य नागरिक आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी, असेही माहिती तंत्रज्ञान महामंडळाने प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### पुण्यात दहा कोटींचे चरस जप्त

● **पुणे** – महसूल गुप्तचर विभागाने पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर १० कोटींचे चरस जप्त केले आहे. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. तसेच डीआरआयच्या पथकाने मुंबईतून आणखी एकाला ताब्यात घेतले आहे. बँकॉकहून पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी (१२ मे) दोघेजण उतरले. त्यांच्याकडे चरस असल्याची माहिती डीआरआयच्या मुंबई पथकाला मिळाली. पथकातील अधिकाऱ्यांनी या दोघांची चौकशी केली. त्यांच्या सामानाची तपासणी केली तेव्हा प्लास्टिकच्या पिशवीत चरस सापडले. चौकशीमध्ये मुंबईतील एकाकडे चरस विक्रीसाठी देण्यात येणार असल्याची माहिती दोघांनी दिली. डीआरआयच्या पथकाने मुंबईतून एकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडूनही चरस जप्त करण्यात आले. या कारवाईत जप्त केलेल्या १० किलो चरसची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत १० कोटी किंमत आहे. या प्रकरणाचा सखोल तपास चालू असून, यापूर्वी पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून केंद्रीय सीमाशुल्क (कस्टम), तसेच डीआरआयच्या पथकाने अनेकवेळा तस्करीचे अंमली पदार्थ, सोने जप्त केले आहे.

# राज्यात आधुनिक औद्योगिक, लॉजिस्टिक पार्क उभे राहणार

## ५ हजार कोटींची गुंतवणूक, ब्लॅकस्टोन समुहासोबत सरकारचा करार

● **मुंबई । वीरभूमी**–
राज्यातील लॉजिस्टिक्स पार्क्स क्षेत्रात ५ हजार १२७ कोटींची थेट परकीय गुंतवणूक आणि २७,५१० रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या सामंजस्य करारावर बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्या करण्यात आल्या. राज्य सरकार तसेच ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात हा महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. यानुसार नाशिक जिल्ह्यातील सिन्नरसह पनवेल, भिवंडी, नागपूर, चाकण, खंडवा यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी लॉजिस्टिक्स पार्क्स विकसित केले जाणार आहेत.




आज झालेला सामंजस्य करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे. या करारानुसार महाराष्ट्रात १० हून अधिक आधुनिक औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी ७९४.२ एकर जमीन उपलब्ध करून देण्यात येणार असून यापैकी १ कोटी ८५ लाख चौरस फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल.

सह्याद्री अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ. पी. अन्बलगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर. के. नारायणन यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या वेळी उपमुख्यंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन ॲडहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन ॲडव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते.

### लॉजिस्टिक हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल

■ ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक तसेच लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणार आहे. भारतातील उत्पादन, वेअर हाऊसिंग आणि पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

## न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे ५२ वे सरन्यायाधीश

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–
न्यायमूर्ती भूषण गवई यांनी देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून बुधवार दि. १४ मे रोजी शपथ घेतली. भूषण गवई हे भारताचे पहिले बौद्ध सरन्यायाधीश आहेत. त्यांनी सामाजिक आणि राजकीय न्यायासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून काम करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. त्यांचा जीवनप्रवास हा सामाजिक न्याय, समर्पण आणि कष्टाच्या मूल्यांचा आदर्श आहे. त्यांच्या नेतृत्वात भारतीय न्यायव्यवस्थेतील समावेशिता आणि विविधता अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे. हा सोहळा राष्ट्रपती भवनात पार पडला. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आदी उपस्थित होते. न्यायमूर्ती गवई हे देशातील दुसरे दलित सरन्यायाधीश असतील. त्यांच्या आधी न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन हे पहिले दलित सरन्यायाधीश झाले होते. २००७ मध्ये न्यायमूर्ती बालकृष्णन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बनले होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून, न्यायमूर्ती गवई यांनी अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यामध्ये मोदी सरकारच्या २०१६ च्या नोटाबंदीच्या निर्णयाचे समर्थन करणे आणि निवडणूक रोखे योजना असंवैधानिक घोषित करणे समाविष्ट आहे.न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जीवनप्रवास महाराष्ट्रातील अमरावती पासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतचा एक प्रेरणादायी प्रवास आहे.

## अकोले तालुक्यात सलग पाचव्या दिवशी पावसाची हजेरी

● **अकोले । वीरभूमी**–
अकोले तालुक्यातील बहुतांश भागात सलग पाचव्या दिवशी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर व शेतात पाणीच पाणी साठले होते.अकोले शहर व परिसरात दुपारच्या वेळी एक ते दीड तास जोरदार पाऊस पडला. आढळा व प्रवरा विभागात सर्वदूर धुव्वाधार पाउस कोसळला.

आढळा विभागातील समशेरपुर, टाहाकारी, सावरगाव पाट, देवठाण, तांभोळ, वीरगाव, पिंपळगाव निपाणी, हिवरगाव, डोंगरगाव, गणोरे या गावासह प्रवरा पट्ट्यातील विठे ते कळस पट्ट्यातील सर्व गावांतही दुपारी धो- धो पाऊस कोसळला. सुमारे तास- दिड तास पाउस सुरू असल्याने रस्त्यावर व शेतांमध्ये पाणीच पाणी साठले होते. ओढे नाले यांचे पाणी नदीला मिळत आहे. त्यामुळे प्रवरा नदी पात्र वाहते झाले आहे.

मुळा विभागातील काही गावांत अवकाळी पाऊसाने हजेरी लावली. तर आदिवासी भागातील पश्चिम पट्ट्यात अवकाळी पावसामुळे शेती पिकांसह, शाळा खोल्या, ग्रामपंचायत इमारत, घरे, जनावरांचे गोठे, रस्त्यांचे सततच्या पावसामुळे मोठ्या



प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे आदिवासी विभागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या परीसरात गारठा निर्माण झाला आहे.

जोरदार पावसामुळे खराब झालेले शिरपुंजे ग्रामपंचायतचे पत्रे यापूर्वी दोन वेळेस दुरुस्त करण्यात आले होते. त्यांनतरही दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे काही पत्रे वाकले आहेत. लोखंडी पोलही वाकले आहेत.असे येथील सामजिक कार्यकर्त्यांनी कळविले आहे.निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत च्या कारभारा बाबत नाराजी व्यक्त केली आहे. चार पाच दिवसांपासून सुरू असणाऱ्या अवकाळी पावसामुळे या परिसरातील अनेक घरे, जनावरांचे गोठे, रस्त्यांचे नुकसान झाले आहे.

अकोले तालुक्यामध्ये अकोले तालुक्यामध्ये विशेषत्वाने पश्चिम विभागामध्ये गेल्या तीन ते चार दिवसापासून मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस पडत असून या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यासंबंधी शेतकऱ्यांच्या पिकांचा पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख महेशराव नवले यांनी केली आहे.

दरम्यान शिर्डी लोकसभेचे माजी खासदार सदाशिव लोखंडे साहेब यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना पत्र व्यवहार करून व दूरध्वनीवर संपर्क साधून तालुक्यातील अवकाळी पावसाच्या नुकसान भरपाई संदर्भात माहिती दिली असून अकोले तालुक्यात तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. अशी माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख एकनाथ यादव यांनी दिली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन पंचनामे करण्यासंदर्भात अवकाळी संदर्भात माहिती दिली असल्याचे एकनाथ यादव यांनी सांगितले.

# कुकडीचे आवर्तन १६ मे रोजी सुटणार; लेखी आश्वासनानंतर म्हस्के यांचे उपोषण स्थगित

## कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांचे लेखी आश्वासन । दोन दिवसात आवर्तनाबाबत प्रशासन भूमिका जाहीर करणार

● **श्रीगोंदा । वीरभूमी**–
कुकडी आवर्तनासाठी व तातडीने फळबागांना पाणी मिळण्याच्या मागणीसाठी जलसंपदा विभागाने त्वरीत निर्णय घ्यावा व कर्जतच्या अगोदर श्रीगोंद्याला पाणी द्यावे, या मागणीसाठी पाटपाणी कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी मंगळवार दि. १३ मे पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. आंदोलनादरम्यान जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता यांच्यावतीने कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांच्या लेखी आश्वासन दिल्यानंतर श्री. म्हस्के यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता प्रविण घोरपडे यांनी उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी चर्चेदरम्यान ते म्हणाले की, म्हस्के यांच्या मागणीचा विचार करून २० मे आवर्तनाची तारीख बदलून १६ मे करण्यात आली आहे. १६ मे रोजी आवर्तन सुटणार असून आवर्तनचा कालावधी व पाण्याचे नियोजन दोन दिवसांत जाहीर करू. श्रीगोंद्याला अगोदर पाणी देण्याच्या मागणी संदर्भात वरिष्ठ कार्यलयाशी चर्चा करून निर्णय घेऊ असे सांगत दि. १६ मे रोजी आवर्तन सुटणार असल्याचे असे लेखी पत्र श्री. म्हस्के यांना दिले.

यावेळी राजेंद्र म्हस्के म्हणाले की, सदरच्या पत्रावर उपोषण न सोडता उपोषण तात्पुरते स्थगित करत आहोत.आपण केलेल्या मागण्यांपैकी एक मागणी पूर्ण झाली असून, येत्या दोन दिवसांत पाणी सुटणार आहे. परंतू रोटेशनचा कालावधी व पाण्याचे नियोजन कसे करणार आहेत हे अद्यापही संभ्रमात आहे. दोन दिवसांत रोटेशन नियोजन जाहीर करू असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले आहे. उपोषण थांबवण्याची इच्छा नाही परंतू प्रकृती बिघडल्याने हे आंदोलन स्थगित करत आहे. परंतू लाभधारक शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाहीतर पुन्हा रस्त्यावर उतरणार आहे.

### अगोदर श्रीगोंद्याला पाणी द्या, अन्यथा कुकडी कॅनॉल मध्ये उतरणार : राजेंद्र म्हस्के

■ कर्जत आधी श्रीगोंदा तालुक्याला पाणी द्यावे हि माझी प्रमुख मागणी असून मागच्या वेळी आमच्यावर अन्याय झाला परंतू आता अन्याय सहन करणार नाही. लाभधारक शेतकऱ्यांना घेऊन कॅनॉल मध्ये उतरुन आंदोलन करणार असल्याचा इशारा कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी दिला आहे.



लेखी आश्वासनानंतर श्री. म्हस्के यांनी १३ मे पासून सुरू केलेले उपोषण स्थगित केले. यावेळी उपोषणस्थळी बाबासाहेब भोस, हरिदास शिर्के, अनिल ठवाळ, प्रमोद राजेंद्र म्हस्के, एकनाथ आळेकर, गंगाराम दरेकर, अरूण जगताप, दत्तात्रय हिरणावळे, सुनील भोस, विश्वास थोरात, भाऊसाहेब मांडे यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

# SPOT NEWS



पूजा निवडूंगे कार्तिकी आरे प्रेम मिसाळ

## दामोदर विधाते विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या परीक्षेत यश

**● नगर । वीरभूमी-**
सारसनगर येथील जनकल्याण शिक्षक प्रसारक मंडळ संचलित कै. दामोदर विधाते (मास्तर) माध्यमिक विद्यालयाचे इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे गुण मिळवून यश संपादन केले. शाळेचा ८९.१३ टक्के निकाल लागला. विद्यालयाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक- पूजा किशोर निवडूंगे (९२ टक्के), द्वितीय क्रमांक- कार्तिकी नागेश आरे (९१.८० टक्के), तृतीय- प्रेम सुनिल मिसाळ (८४.२० टक्के) क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकाविला आहे. विद्यालयातील ८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत, ७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व १८ विद्यार्थी द्वितीय तर ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांना सारिका गायकवाड, अमोल मेहेत्रे, सचिन बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब (अण्णा) विधाते, रामदास कानडे, संस्था सरचिटणीस प्रा. शिवाजी विधाते, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष सुसे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी अभिनंदन केले.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलचा सलग तिसऱ्या वर्षी सीबीएसई बोर्डाचा शंभर टक्के निकाल

**● नगर । वीरभूमी-**
पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर सीबीएसई बोर्डाचा सन २०२४-२५ या वर्षातील इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला. शाळेतील श्रुती बाळासाहेब देंडगे हिने ९७.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर प्रज्ञेश अमित बुचडे व अथर्व रणजीत पाटील या दोघांनी ९६.६० % गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. सार्थक मुकेश दौड याने ९६.४०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच समर्थ मुकेश दौड ९६.२०%, प्रणव मंगेश चौधरी ९५.८०%, जान्हवी बाळकृष्ण हनपुडेपाटील ९५.२०%, वेदांत नारायण शिंदे ९५.००%, श्रेया साहेबराव डावरे ९५.००%, श्रीहान हरिश्चंद्र शिंदे ९४.८०%, आशुतोष शिवशंकर वलांडे ९१.००% या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष उज्वल यश संपादन केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, हिंदी, विज्ञान, गणित, समाजशास्त्र, संगणक या सर्व विषयांमध्ये ९०% च्या वर गुण मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे प्राचार्य मा. श्री. मंगेश जगताप सर यांनी अभिनंदन केले व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे प्राचार्य मा. श्री. मंगेश जगताप सर, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, शाळेचे सीनियर अँडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव व शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.शाळेचे प्राचार्य व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उपजिल्हा रुग्णालयात डायलेसीसची सुविधा सुरु

### आ. मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते उद्घाटन । रुग्णांना सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे दिले आश्वासन

**● पाथर्डी । वीरभूमी -**
येथील उपजिल्हा रुग्णालयात डायलेसीसची सुविधा सुरु करण्यात आली आहे. रोज एका वेळेला आठ रुग्णांना व दिवसाला २४ रुग्णांना ही सुविधा मिळू शकणार आहे. उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार अतिशय चांगला सुरु आहे. शासनाकडुन रुग्णालयात सुविधा पुरविण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे आश्वासन आमदार मोनिकाताई राजळे यांनी दिले.



येथील उपजिल्हा रुग्णालयात महाडायलेसीस योजनेतुन आठ बेडची सुविधा शासनाच्या आरोग्य विभागाने उपलब्ध करुन दिली त्या सेवेचा शुभांरभ आ.राजळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपाचे मंडळ अध्यक्ष धनंजय बडे, अशोकराव चोरमले, वैद्यकीय अधिक्षक डॉ.सचिन दरंदले, राहुलदादा राजळे, सुनिल ओव्हळ, मंगलताई कोकाटे, ज्योती शर्मा, मनिषा घुले, डॉ. मनिषा खेडकर, भगवान साठे, संदीप पठाडे, अमोल गर्जे, मुकुंद गर्जे, जगदिश काळे, अनिल बोरुडे, परिचारिका सारिका तमखाने आदी नागरीक व कर्मचारी उपस्थीत होते.

यावेळी बोलताना आ. राजळे म्हणाल्या, पाथर्डीत रुग्णांना डायलेसीससाठी अहिल्यानगरला जावे लागत होते. गाडीखर्च व इतर खर्च परवडणारा नव्हता. हा महागडा उपचार आहे. शासनाने आरोग्याच्या सुविधा देवुन गरीबांच्या सेवेचे व्रत पुर्ण केले आहे. आता येथे रुग्णांना मोफत सुविधा मिळणार आहे. उपजिल्हा रुग्णालयात ३५० झाडे लावुन येथील वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन दरंदले व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवा आदर्श निर्माण केला आहे. महीलांना देखील येथे प्रसुतीसह विविध शासकिय योजनांच्या माध्यमातुन चांगल्या सुविधा दिल्या जात आहेत. आपल्याला सुविधा देणाऱ्या वैद्यकीय अधिक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांना देखील चांगली वागणुक दिली गेली पाहीजे.स्वच्छ असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात आता रुग्णांना मोफत डायलेसीसची सुविधा मिळेल. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जागर आरोग्याचा ही नाटिका सादर केली. प्रस्ताविक वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन दरंदले यांनी केले. सुत्रसंचालन संदीप कांबळे यांनी केले तर गणेश विधाते यांनी आभार मानले.

## न्यू इंग्लिश स्कूलदेर्डे चांदवडचा एस.एस. सी. परीक्षेचा निकाल ९०.०० टक्के



**● कोपरगाव । वीरभूमी-**
कोपरगाव तालुक्यातील देर्डे चांदवड येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल देर्डे चांदवडचा एस. एस.सी. परीक्षेचा निकाल ९० टक्के एवढा लागला असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश देशमुख यांनी दिली आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. परीक्षेसाठी एकूण ५० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यामध्ये ०३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, १२ प्रथम श्रेणी, १८ द्वितीय श्रेणी, तर १२ विद्यार्थ्यांनी पास श्रेणी मिळविली आहे. विद्यालयात सर्वाधिक ८९.२० टक्के गुण मिळवून कु. अनुराधा जयराम गवळी प्रथम आली आहे. तर कु. गौरी दगडू सूर्यवंशी या विद्यार्थिनीने ७६.६० टक्के गुण मिळवून द्वितीय व रितेश परागीर गोसावी या विद्यार्थ्याने ७६. ४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मा.आ. अशोकराव काळे, आ.आशुतोष काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड, सचिव सौ. चैतालीताई काळे, इन्स्पेक्टर नारायण बारे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक प्रकाश देशमुख, सर्व पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## दहावी-बारावीच्या निकालात महादजी शिंदे विद्यालय गुणवत्तेत अग्रेसर

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**
रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयाने दहावी-बारावीच्या वार्षिक परीक्षेत उत्तुंग यश मिळवले आहे. नुकताच जाहीर झालेला पुणे बोर्डाच्या दहावीचा निकाल जाहीर केला. यात महादजी शिंदे विद्यालयाचा दहावीचा निकाल ९७.६०% लागला असून चि. शिंदे धैर्यशील बाळू या विद्यार्थ्याने ९६.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. चि. भूतारे वेदांत प्रवीण हा ९७ % मिळवून द्वितीय आला तर चि. वाळके संस्कार नितीन याने ९५.८०% गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला. विशेष बाब म्हणजे २२ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विशेष प्राविण्य श्रेणीत ६५ विद्यार्थ्यांनी बाजी मारली तर प्रथम श्रेणीत १०६ विद्यार्थी यशस्वी झाले. द्वितीय श्रेणीत ७६ व उत्तीर्ण श्रेणीत २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



इयत्ता बारावीचा ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९८.३३% टक्के इतका आला असून सुद्रिक यश मच्छिंद्र याने ७३.१७ गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय स्थानी कु. पठाण सुफिया अख्तर हिने ७२.८३ % गुण मिळवले. तर तृतीय क्रमांकावर कु. बोरुडे जाई शिवाजी ७०.७३ % गुण मिळवून उत्तीर्ण झाली. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनिता काकडे, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष बाबासाहेब भोस, रवि दंडनाईक, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आयएएस अधिकारी भाऊसाहेब दांगडे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप यांनी अभिनंदन केले.

# नवउद्योजकांना दुबईत उत्पादने निर्यातीसाठी मार्गदर्शन करणार : धनंजय दातार

**● मुंबई । प्रतिनिधी-**
मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी महाराष्ट्रातील नवउद्योजकांची उत्पादने दुबईसह संयुक्त अरब अमिरातीत निर्यात करण्यासाठी मदतीची तयारी दाखवली आहे. दुबईच्या उंबरठ्यावरुन जागतिक बाजारपेठेत व्यवसाय वाढवण्यास इच्छुक असलेल्यांना मनापासून मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

सोलापूर येथील आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक व्यावसायिकांच्या शिष्टमंडळाने नुकतीच धनंजय दातार यांची येथे भेट घेऊन त्यांच्यापुढे सोलापूरच्या शेंगा चटणी, ज्वारीची कडक भाकरी, उत्कृष्ट दर्जाची ज्वारी, तांदूळ व डाळी अशा कृषी उत्पादनांचे सादरीकरण केले. एका बॅग उत्पादकाने नावीन्यपूर्ण पॅकेजिंग सोल्यूशन्सही सादर केली. दातार यांनी या सर्वांच्या गुणवत्तेचे कौतुक केले व काही उत्पादने आपल्या अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स समूहातर्फे खरेदी करण्याची तयारीही दाखवली.

भारतातून दुबईत उत्पादने निर्यात करण्यासाठीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर तरतुदी, दर्जा व पॅकेजिंगसंबंधी नियम तसेच व्यवसायाचे विपणन करताना घ्यायची काळजी अशा विविध पैलूंवर दातार यांनी या शिष्टमंडळाला मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारतातून आखाती देशांत विशेषतः संयुक्त अरब अमिरातीत होणारी निर्यात मुख्यतः सागरी वाहतुकीद्वारे होते आणि ती स्वस्त असते. मात्र या प्रवासाला साधारणतः २० दिवस लागत असल्याने शेल्फ लाईफ अत्यल्प असलेली नाशवंत उत्पादने विचारात घेऊ नयेत. किमान सहा महिने ते वर्षभर टिकणारी उत्पादने निवडावीत. आम्ही आमच्या सुपर स्टोअर्सच्या साखळीद्वारे आखाती बाजारपेठेत शुद्ध, स्वच्छ व अस्सल उत्पादने पुरवतो. हल्ली सेंद्रीय उत्पादनांवर ग्राहकांचा विशेष भर आहे. उत्पादनांचे पॅकेजिंग सुरक्षित व टॅम्परप्रूफ असावे. आम्ही आमच्या पिकॉक ब्रँडअंतर्गत अलिकडे पौष्टिक खपली गहू सादर केला. त्याला येथील ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्याच धर्तीवर नैसर्गिक, रसायनमुक्त, भेसळमुक्त व आरोग्यदायी कृषिउत्पादने व खाद्यउत्पादने पाठवल्यास उत्पादकांनाही समाधानकारक आर्थिक फायदा मिळेल. भेसळ, ग्राहकांचे नुकसान, फसवणूक किंवा अनारोग्यकारक उत्पादनांबाबत आखाती देशांचे धोरण व कायदे कडक असल्याने निर्यातदाराने काटेकोर राहण्याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले.

महाराष्ट्रातील उत्पादक व व्यावसायिकांना आगामी काळात प्रगतीच्या, निर्यातीच्या व व्यवसायवाढीच्या मोठ्या संधी असल्याचे सांगताना दातार पुढे म्हणाले की मुंबईजवळ पालघर जिल्ह्यात वाढवण हे आंतरराष्ट्रीय बंदर आकाराला येत आहे. पुढील दहा वर्षांत ते संपूर्ण कार्यान्वित होईल. त्यामुळे महाराष्ट्राला मुंबईजवळ जेएनपीटी व वाढवण अशी दोन मोठी आंतरराष्ट्रीय बंदरे जागतिक निर्यातीसाठी उपलब्ध असतील. महाराष्ट्रात पायाभूत सुविधा झपाट्याने विकसित होत आहेत. समृद्धी महामार्गाने विदर्भाला मुंबईशी जोडले आहे. अशा प्रस्तावित महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा फायदा वेळेत उठवण्यासाठी आपण सज्ज राहिले पाहिजे. ज्यांना उत्तम व यशस्वी उद्योजक तथा निर्यातदार बनायचे असेल त्यांनी आतापासूनच आयात-निर्यात व्यवहारांची माहिती घ्यावी, शक्य असल्यास त्याचा अभ्यासक्रम शिकावा आणि उद्योग उभारुन दोन-तीन वर्षांत निर्यात सुरू करावी म्हणजे अजुन दहा वर्षांनी विकसित महाराष्ट्राच्या प्रगतीत तेही सुस्थापित बनून योगदान देऊ शकतील. महाराष्ट्रात अनेक गरीब, मेहनती व होतकरु तरुण उद्योजकतेची, समृद्धीची स्वप्ने बघत आहेत आणि त्यांच्यातून हजारो उद्योजक निर्माण व्हावेत, हे माझे स्वप्न आहे. मी गेली ३० वर्षे दुबईत मराठी संस्कृती व उद्यमाच्या प्रसारासाठी कार्यरत आहे. त्यामुळे सोलापूरप्रमाणेच महाराष्ट्रातील अन्य शहरांतील तरुणांनीही नावीन्यपूर्ण उत्पादने व कल्पनांसह पुढे यावे. त्यांना मी जरुर मार्गदर्शन करेन.



डॉ. धनंजय दातार यांचा सत्कार दुबई करताना सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख व व्यापारी असोसिएशनचे सदस्य.

या शिष्टमंडळात आमदार देशमुख यांच्याखेरीज सोलापूर गार्मेन्ट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे संचालक अमित जैन, उद्यम पीएएचएसयूआय फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी, अल्पेश संकलेचा, विजय पाटील, यश जैन, प्रदीप जैन, आनंद झाड आणि चंद्रशेखर जाधव आदींचा समावेश होता.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## आबासाहेब काकडे विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**● शेवगाव । वीरभूमी–**

दहावीच्या बोर्ड परीक्षेत येथील आबासाहेब काकडे माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या सेमी माध्यमाचा निकाल ९६.४८ टक्के तर मराठी माध्यमाचा निकाल ७०.५१ टक्के इतका लागला. सेमी माध्यमामध्ये शुभांगी संजय विखे हिने ९५.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. चेतन सोमनाथ मुरदारे याने ९५.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर गौरी सुधीर कंठाळी हिने ९५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. मराठी माध्यमामध्ये शुभांगी भगवान भवर हिने ८०.८० टक्के गुण मिळून प्रथम क्रमांक पटकावला. कावेरी अशोक काळे ७९.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर वर्षा दगडू नजन हिने ७८.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयाचा सरासरी निकाल ८५.९० टक्के इतका लागला असून ९८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ६८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. पैकी १२ विद्यार्थ्यांनी ८५ टक्के ते ९० टक्के च्या दरम्यान गुण मिळवले आहेत तर ७ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड.डॉ. विद्याधरजी काकडे, जि.प.सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, उपप्राचार्या रुपा खेडकर, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके, शिवाजी पोटभरे यांच्यासह पालक वर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आढळगाव विद्यालयाचा निकाल ९६.१० टक्के

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील आढळगाव येथील रयत शिक्षण संस्थेचे पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स विद्यालयाचा दहावीचा निकाल ९६.१० टक्के लागला असून विद्यालयात वेदिका विजय काळे हिने ९५ टक्के व सेजल उत्तम डोके हिने ९५ टक्के गुण मिळवत संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक अनुष्का संदीप शिंदे ९३.२० टक्के तर तृतीय क्रमांक यश सचिन शिंदे याने ९०.८० टक्के गुण मिळवत पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालय, पालक व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन होत आहे.

## मढेवडगाव विद्यालयाचा निकाल ९६.२२ टक्के

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील मढेवडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल ९६.२२ टक्के लागला असुन परीक्षेला १०७ विद्यार्थी बसले होते. विद्यालयात शेळके प्रतीक राजेंद्र ८९.६० टक्के गुणांसह प्रथम आला. द्वितीय क्रमांक सोमवंशी कार्तिकी संतोष ८९.४० टक्के तर शिर्के पूजा पोपट ८९.२० टक्के गुण मिळवून तिसरी आली. मांडे अपूर्वा रावसाहेब ८९ टक्के, विघ्ने प्रीती दिलीप ८८.४० टक्के यांनी विशेष प्राविण्य मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांचे उत्तर विभागाचे चेअरमन, विभागीय अधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, माता पालक संघ, विद्या समिती, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# निळवंडे धरणाचे पाणी रांजणगाव देशमुख परीसरात

**शेतकऱ्यांना दिलासा । शेतकऱ्यांनी मानले आ. आशुतोष काळेंचे आभार**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव मतदार संघाच्या जिरायती गावाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे धरणाचे पाणी नियमितपणे जिरायती गावांमध्ये पोहोचत असून ज्या ज्यावेळी निळवंडेचे आवर्तन सुरु होते त्या त्यावेळी आ. आशुतोष काळे स्वत: लक्ष घालून हे पाणी सर्वच लाभधारक क्षेत्रातील गावांमध्ये पोहचवत आहे. याहीवेळी सुरु असलेल्या आवर्तनातून तळेगाव ब्रांचमधून रांजणगाव देशमुख व परीसरातील जिरायती गावांमध्ये निळवंडेचे पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे या गावातील नागरीकांना व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.



मागील कित्येक दशकापासून कोपरगाव मतदार संघातील जिरायती भागातील नागरिक निळवंडेच्या पाण्याची चातकाप्रमाणे वाट पाहत होते. निळवंडे धरणाच्या कालव्याच्या निर्मितीनंतर वितरीकांची कामे पूर्ण न झाल्यामुळे मतदार संघातील अनेक गावात सहजपणे निळवंडेचे पाणी येणे अशक्य होते. परंतु आ.आशुतोष काळे यांनी याबाबत पाटबंधारे विभागाकडे केलेला पाठपुरावा व वेळप्रसंगी स्वत:ची यंत्रना वापरून या जिरायती भागातील गावात निळवंडेचे पाणी पोहोचविले आहे. त्यामुळे ज्या जिरायती गावांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर आवलंबून रहावे लागत होते त्या जिरायती गावांना भर उन्हाळ्यात देखील पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवली नाही.

सध्या सुरु असलेल्या कवठे कमलेश्वर पॉईंट पासून सोडण्यात येणाऱ्या तळेगाव ब्रांचच्या चिंचोली येथून आ. आशुतोष काळे यांच्या सूचनेनुसार कोपरगाव मतदार संघातील रांजणगाव देशमुख व परीसरातील जिरायती गावांसाठी निळवंडेचे पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये प्रचंड उत्साह व आनंदाचे वातावरण पसरले असून पाणी सोडण्यासाठी आ.आशुतोष काळे नेहमीच घेत असलेल्या पुढाकाराबद्दल या गावातील नागरीकांनी त्यांचे विशेष आभार मानले आहेत.

> निळवंडेचे पाणी प्रत्येक गावापर्यंत पोहोचलेच पाहिजे. प्रत्येक गावातील गावतळे, पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी सबंधित अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. जेणेकरून चांगला पाऊस होईपर्यंत या गावातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व काही प्रमाणात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई जाणवणार नाही याची काळजी घ्या. निळवंडे कालव्याचे पाणी जिरायती गावात पोहोचविण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याचे काम पूर्ण झाले असून त्या पॉइंटवरील सर्व बंधारे भरून द्या.
>
> **– आ. आशुतोष काळे**

## सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात माध्यमिक विद्याभवन शाळेचा दहावीचा १०० टक्के निकाल



**● संगमनेर । वीरभूमी–**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अमृत सांस्कृतिक मंडळ, अमृतनगर संचलित सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात माध्यमिक विद्याभवन या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयाने सातत्याने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.

या निकाला विषयी माहिती देताना मुख्याध्यापिका संगीता म्हस्के व कार्याध्यक्ष तांबडे म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री तथा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात माध्यमिक विद्याभवन या विद्यालयाने सालाबाद प्रमाणे यावर्षीही १००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यात चि. यशवर्धन सोमनाथ सोनवणे यांने ८९.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला आहे, द्वितीय क्रमांक कु. सायली सुरेश भडांगे ८८.२०%, तृतीय क्रमांक कु. भक्ती मारुती सोनवणे ८४.२०%, चतुर्थ क्रमांक चि. साईज संजय आळनर ८३.२०% व पाचवा क्रमांक कु. सदिच्छा दत्तात्रय बोरसे ८२% गुण मिळवून मिळवला आहे. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका संगीता मस्के, शिक्षक राजू बड, उत्तम गवांदे, जैनुद्दीन तांबोळी, इंद्रभान शिंदे व दीपक आदमाने तसेच प्राथमिक विद्याभवनचे सर्व शिक्षक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाराष्ट्राचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, अमृत सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष रामदास तांबडे, सेक्रेटरी संदीप दिघे, खजिनदार भारत देशमुख, सर्व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

## वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची सीबीएससी बोर्डच्या दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यशाची परंपरा कायम

**● अकोले । वीरभूमी–**

सीबीएससी बोर्डचा इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला. अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी अभिनव शिक्षण संस्थेच्या उज्वल यशाची समृद्ध परंपरा कायम ठेवत इयत्ता दहावीच्या निकालात उत्तुंग यश संपादन केले. शाळेचा निकाल शंभर टक्के लागला. त्यापैकी ५४ म्हणजेच ८३% विद्यार्थी. नऊ विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक मार्क्स आहेत २८ विद्यार्थ्यांना ८० टक्के पेक्षा अधिक मार्क्स आहेत.



भोजने रुद्राणी रामदास ही विद्यार्थिनी ९६.८० टक्के गुण मिळवून प्रथम आली. कोकणे श्रुतिका दिलीप ९५.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, नाईकवाडी ज्योत्स्ना अमित व वाकचौरे श्रावणी धनराज या दोन विद्यार्थिनी ९४.६० टक्के गुण मिळवून तृतीय, घरटे मोक्षदा अनिल ९१.८०% गुण मिळवून चौथ्या क्रमांकावर, शेळके माऊली विजयकुमार ९०.८० टक्के गुण मिळवून पाचव्या क्रमांकावर, मुठे ओंकार भास्कर ९०.६० टक्के गुण मिळवून सहाव्या क्रमांकावर, धात्रक विधी मंगेश ही विद्यार्थिनी ९०.२० टक्के गुण मिळवून सातव्या क्रमांकावर, ढेकणे समर्थ सचिन ८९.६० टक्के गुण मिळवून आठव्या क्रमांकावर, तिकांडे अखिलेश प्रकाश ८९.४० टक्के गुण मिळवून नवव्या क्रमांकावर तर देशमुख जानव्ही संदीप ८९.२० टक्के गुण मिळवून दहाव्या क्रमांकावर उत्तीर्ण झाले. वाकचौरे श्रावणी धनराज या विद्यार्थिनीने इंग्लिश मध्ये ९९ मार्क्स, धात्रक विधी मंगेश या विद्यार्थिनींनी हिंदीमध्ये ९९ मार्क्स, भोजने रुद्राणी रामदास या विद्यार्थिनीला मॅथेमॅटिक्स मध्ये ९१ मार्क्स, कोकणे श्रुतिका दिलीप या विद्यार्थिनीला सायन्स मध्ये ९६ मार्क्स तर भोजने रुद्राणी रामदास या विद्यार्थिनीला सोशल सायन्स मध्ये ९८ मार्क्स, तर भोजने रुद्राणी रामदास व कोकणे श्रुतिका दिलीप या दोन विद्यार्थिनींनी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयात शंभर पैकी १०० गुण १०० मिळवून प्रथम येण्याचा बहुमान



मिळवला. या सर्व विद्यार्थ्यांना वसुंधरा अकॅडमीतील शिक्षक सुनील खताळ, वृषाली शेटे, सोनिया नवले, किरण अंबरे, दर्शना अरदाड यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकररावजी नवले तथा भाऊ, संस्थेचे सचिव मा. विक्रम नवले, संस्थेच्या कॅम्पस डायरेक्टर तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, संस्थेच्या सहसचिव प्राचार्य अल्फोंसा डी. प्राचार्य राधिका नवले, प्राचार्य कुसुम वाकचौरे व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

# जमिनीचा ताबा देण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना दमदाटी व शिवीगाळ

**शेवगाव पोलिस ठाण्यात २७ पुरुष व महिलांवर गुन्हा दाखल**

**● शेवगाव । वीरभूमी –**

येथील भुमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी, पोलीस अधिकारी यांच्यासह मंडलाधिकारी हे जमिनीची मोजणी करुन जमिनीचा ताबा देण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांसह अर्जदारास प्रतिवादी व त्यांच्या नातेवाईकांनी दमदाटी व शिवीगाळ करण्यात आली. हा प्रकार शेवगाव तालुक्यातील भावीनिमगाव येथे मंगळवार दि. १३ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडला. या प्रकरणी शेवगाव पोलिस ठाण्यात दहिगावने येथील मंडलाधिकारी सोनाली लक्ष्मण दहिफळे यांच्या फिर्यादीवरुन १५ पुरुष व १० ते १२ महिला अशा २७ जणांवर कलम १३२, १८९ (२), १९१ (२), १९०, ११८ यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोनाली दहिफळे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शेवगाव तालुक्यातील भावीनिमगाव येथील गट नं. ५४२/१ क्षेत्र १ हेक्टर ६० आर. क्षेत्र भानुदास दादा शेळके व इतर १४ व नानासाहेब विठ्ठल जाधव गट नं. ५४१/२ क्षेत्र ०.४० आर क्षेत्र महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९ चे कलम २१ अन्वये उपविभागीय अधिकारी पाथर्डी यांच्या आदेशान्वये व उपविभागीय भुमी अभिलेख शेवगाव यांनी हद्द निश्चित करुन दिली. त्यांच्या आदेशान्वये भानुदास शेळके व नानासाहेब जाधव यांना जमिनीचा ताबा देण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी शरीफ शेख, पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने, पोलीस अंमलदार उमेश गायकवाड व महिला पोलीस कर्मचारी प्रियंका शिरसाट यांच्यासह सदरील गट नंबरमध्ये मोजणी करुन ताबा देण्याची कार्यवाही करुन पंचनामा करीत असतांना प्रतिवादी रामदास किसन गुंजाळ, बहीरनाथ नरसू गुंजाळ, एकनाथ गोविंद गुंजाळ, दत्तु गंगाराम गुंजाळ, भिमराज तुकाराम गुंजाळ, बाळासाहेब बाबुराव गुंजाळ, चिमाजी नामदेव गुंजाळ, संजय नामदेव गुंजाळ, बाळासाहेब एकनाथ गुंजाळ, गोटीराम राडू गुंजाळ, लक्ष्मण विठ्ठल गुंजाळ, जालींदर रामदास गुंजाळ, रोहिदास अशोक गुंजाळ, देविदास श्यामराव गुंजाळ यांच्यासह अंदाजे १० ते १२ महिलांनी अर्जदारास शिवीगाळ करुन दमदाटी केली. या सर्वांना समजावुन सांगण्यासाठी गेले असता त्यांनी शिवीगाळ व दमदाटी करुन गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. असे फिर्यादीत म्हटले आहे. त्यामुळे या सर्व महिला व पुरुषांविरुध्द दहिफळे यांच्या फिर्यादीवरुन विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.ना. संदिप आव्हाड हे करीत आहेत.

# माजी नगरसेवक रामनाथ बंग यांच्याकडून टँकरने पाणीपुरवठा

**पाथर्डी पालिकेचा पाणीपुरवठा बंद । प्रभागातील नागरिकांना मिळाला दिलासा**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहर व उपनगरात मागील नऊ ते दहा दिवसांपासून पालिकेचा पाणीपुरवठा बंद असल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. यादरम्यान शहरातील कर्तव्यदक्ष नगरसेवक म्हणून ओळख असलेल्या माजी नगरसेवक रामनाथ बंग यांनी आपल्या प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार घरोघरी टँकर व छोट्या रिक्षाद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे.



सध्या पालिकेत लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना छोट्या छोट्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पालिकेत प्रशासकीय राज असल्याने योग्य माहिती मिळत नाही व मग दाद कुणाकडे मागावी असा प्रश्न उभा राहतो. माजी नगरसेवक व माजी उपनगराध्यक्षा दिपाली बंग मात्र आपल्या प्रभागातील नागरी समस्या बाबत जागरुकतेने लक्ष देत असतात. पाणी टंचाई, स्वच्छता, लाईट आदी समस्या पदावर नसल्या तरी पदर खर्चाने व तातडीने सोडवतात. उन्हाळ्याचे तीव्र चटके बसत असताना पालिका प्रशासन शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास अपयशी ठरत आहे. येत्या एक दोन दिवसात पाणीप्रश्न न सुटल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ही शहरातील पाणी टंचाईने त्रस्त नागरिकांनी दिला आहे. तीव्र उन्हाळ्यामुळे पाणी पातळीत फरक पडला असून अनेक ठिकाणच्या खाजगी बोरवेलचेही पाणी आटलेले आहे. शहरातील नागरिकांना या पाणीटंचाईच्या झळा बसत असून नागरिकांना रोज पाणी विकत घ्यावे लागत आहे.

शहरातील जुनी पाणीपुरवठा योजना आता कालबाह्य झाल्याने मागील काही महिन्यांपासून शहराला विविध कारणांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्यात पालिका प्रशासनाला अपयश येत आहे. वीज पुरवठा खंडित होणे, वीजेच्या तारा तुटणे, पाइपलाइन फुटणे, पाणी उपसा मोटारी नादुरुस्त होणे आदी कारणे यामागे आहेत. सध्या शहरासह उपनगरात पाच सहा ते आठ दिवसांनी एकदा पाणी पुरवठा होत आहे. ते ही कमी दाबाने होत असून नागरिकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे महिलावर्गातून पालिका प्रशासना विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान नागरिक वेळेवर पाणी पट्टी भरूनही त्यांना वेळेत पाणी मिळत नसल्याने पालिका कारभार चव्हाट्यावर आला आहे. दरम्यान पालिका प्रशासनाकडून माहिती घेतली असता आजपासून मोटारी सुरू होऊन टाकीत पाणी यायला सुरुवात झाली असून आजच पाणीपुरवठा सुरळीत होईल असे समजले.

